




महाविद्यालयाची सुसज्ज इमारत



महाविद्यालयाचे वस्तीगृह





पोलीस भरतीपुर्व प्रशिक्षण



499



स्थापना : 1989

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" - कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे,

# सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

NAAC - Grade - B+ (CGPA.2.66)

ता. कराड, जि. सातारा

पिन कोड : 415109

फोन नं. : 02164 - 264235

Email:- rssmmuks@yahoo.co.in

www.mrjcollegeumbraj.org

## माहिती पत्रक

## प्राचार्य

फोन :- कार्यालय : 02164-264235

## कार्यालयाची वेळ

सकाळी 10.00 ते सायं. 5.30

(सोमवार ते शुक्रवार)

शनिवार 10.00 ते दु. 02.30

## कॉलेज वेळ

सकाळी 8.00 ते दुपारी 1.00

## आर्थिक व्यवहाराची वेळ

सकाळी 10.00 ते दुपारी 02.00

शनिवार 10.00 ते दु. 01.00

## पत्रव्यवहाराचा पत्ता


प्राचार्य,

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप

महाविद्यालय, उंब्रज.

ता. कराड, जि. सातारा.

पीन. 415 109.


रयत शिक्षण संस्थेचे,

# सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय : एक सुवर्णसंधी

उंब्रज येथील रयत शिक्षण संस्थेचे सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय म्हणजे चाफळ, तारळे, मसूर व उंब्रज पंचक्रोशीतील बहुजन समाजाला मिळालेली सुवर्णसंधी आहे. रयत शिक्षण संस्था ही पश्चिम महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक विकासाची नांदीच होय; हे आता सिध्द झाले आहे. या नांदीचा एक अभिनव चरण म्हणजेच उंब्रजचे महाविद्यालय. ग्रामीण भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना शिक्षणाची सुसंधी सहजपणे उपलब्ध करुन देऊन जीवनाबरोबर सामाजिक विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी उंब्रजचे सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय व त्या अनुषंगाने रयत शिक्षण संस्था कटिबध्द झाली आहे.

सातारा व कराड या ठिकाणी असणारी उच्च शिक्षणाची सुविधा सोडल्यास उंब्रज, चाफळ, तारळे खोऱ्यात अन्य महाविद्यालय नसल्याने उच्च शिक्षणाची संधी या परिसरातील 12 वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना मिळत नव्हती. शिवाय सातारा व कराड या ठिकाणी जाणे हे ही आर्थिकदृष्टया सोईचे नाही. मात्र 1989 साली स्थापन झालेल्या या महाविद्यालयामुळे विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या सर्व प्रकारच्या अडचणींवर मात करता आली आहे.

विद्यार्थी व विद्यार्थिनींनी अधिकाधिक ज्ञानसंपादन करणे, नव्या तंत्रज्ञानाच्या युगाला सामोरे जाणे ही काळाची गरज आहे. आजच्या गतिमान जीवनक्रमात अधिक बुध्दिप्रामाण्यवादी व पुरोगामी झाल्याशिवाय वसुधैवकुटुंबकम् चे ध्येय साधले जाणार नाही. अज्ञान, अंधश्रध्देला मूठमाती देण्यासाठी उच्च शिक्षणाशिवाय पर्याय नाही. म्हणूनच रयत शिक्षण संस्थेने सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालयाच्या रुपाने पुढचे पाऊल उचलले आहे.

## • सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालयाचे अंतरंग व बहिरंग •

• **निसर्गरम्य वातावरण** :- कृष्णा, तारळी व मांड या नद्यांनी सुजलाम् सुफलाम् केलेल्या परिसरात हे महाविद्यालय वसले आहे. जवळूनच पुणे-बेंगलोर हा राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. महाविद्यालयाची भव्य व प्रशस्त इमारत आहे. प्रशस्त आयसीटी व सर्व सोयींनी युक्त वर्ग खोल्या आहेत. महाविद्यालयाच्या सभोवती नारळ, निलगिरी, साग व अशोकाचे उंच हिरवेगार वृक्ष आहेत. हे निसर्गरम्य व सांस्कृतिक वातावरण विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासास पोषक आहे.

• **सुसज्ज ग्रंथालय** :- महाविद्यालयाचे ग्रंथालय प्रशस्त आहे. ते सर्व विषयांच्या पुस्तकांनी समृध्द आहे. क्रमिक पुस्तकांबरोबरच संदर्भग्रंथ, ई रिसोर्सेस व विविध प्रकारची नियतकालिकेही उपलब्ध आहेत. तसेच सर्व प्रमुख वृत्तपत्रे व नियतकालिके इ. उपलब्ध आहेत.

• **तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग** :- महाविद्यालयात वेगवेगळे विषय शिकविण्यासाठी तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग कार्यरत आहेत. वैयक्तिक लक्ष पुरवून विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यावर त्यांचे लक्ष असते.

• **राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.)** :- महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेची सोय असून या योजनेत 100 विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रवेश दिला जातो. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना स्वतंत्र नमुना फॉर्ममध्ये अर्ज केला पाहिजे.

• **क्रीडा विभाग** :- या महाविद्यालयात विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या शारीरिक शिक्षणावरही लक्ष दिले जाते. यासाठी महाविद्यालयात स्वतंत्र क्रीडा विभाग आहे. देशी आणि विदेशी खेळांची सोय आहे. तसेच इनडोअर व आऊटडोअर खेळांची सुविधा महाविद्यालयात उपलब्ध आहेत,अद्यावत जिमनेशियम आहे. निरनिराळ्या खेळांच्या सरावासाठी महाविद्यालयाच्या परिसरात विस्तृत असे क्रीडांगण व सुसज्ज व्यायामशाळा उपलब्ध आहे.



## • शिष्यवृत्त्या व विशेष सवलती •

या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या गरीब व होतकरू विद्यार्थी व विद्यार्थीनींना केंद्र व महाराष्ट्र सरकारतर्फे शिष्यवृत्त्या व सवलती उपलब्ध करुन दिल्या जातात. अशा सवलतींची व शिष्यवृत्त्यांची यादी खाली दिली आहे.

* 1. ई.बी.सी.
* 2. बी. सी. फ्रीशिप
* 3. बी.सी. स्कॉलरशिप
* 4. नॅशनल मेरिट स्कॉलरशिप
* 5. सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिप
* 6. अपंग मुलींसाठी स्कॉलरशिप
* 7. मिलिटरी/सर्व्हिसमनच्या मुलींना फ्रीशिप
* 8. प्राथमिक शिक्षकांच्या मुलींसाठी फ्रीशिप
* 9. रयत शिक्षण संस्था फ्रीशिप
* 10. शासकीय ओपन मेरिट स्कॉलरशिप
* 11. हिंदी स्कॉलरशिप
* 12. युनिव्हर्सिटी स्कॉलरशिप
* 13. अनुसूचित जमाती,भटकी विमुक्त जाती व अल्प उत्पन्न गटांतील विद्यार्थिनींना सवलती

वर दिलेल्या शिष्यवृत्त्या व सवलतीविषयींची निवेदने वेळोवेळी सूचना फलकावर लावली जातात. संबंधित विद्यार्थी व विद्यार्थिनींनी दिलेल्या मुदतीच्या आत कार्यालयीन संबंधित लिपिकाशी संपर्क साधून ज्या त्या विषयांची सविस्तर माहिती मिळवावी.

• **वसतिगृह** :- महाविद्यालयामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 11 व्या योजने अंतर्गत सुसज्ज असे विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी वसतीगृह आहे. उंब्रज, मसूर, तारळे व पंचक्रोशीतील विद्यार्थी व विद्यार्थीनींची राहण्याची व्यवस्था वसतीगृहामध्ये माफक फी मध्ये केली जाते. वसतीगृहामध्ये सर्व सोयींनी युक्त अशा 20 खोल्या आहेत त्यामध्ये 60 विद्यार्थी व विद्यार्थीनींची सोय केली जाते.

• **गुणवंताचा गुणगौरव** :- रयत शिक्षण संस्थेमार्फत गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थीनींचा गुणगौरव केला जातो. यामध्ये रोख रक्कम व प्रमाणपत्र दिले जाते.

● **विद्यार्थी दत्तक योजना :-** विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या अभ्यासातील व इतर अडीअडचणी समजावून घेऊन त्या सोडविणे, विद्यार्थी व विद्यार्थिनींना अचूक मार्गदर्शन करणे, त्यांच्यामध्ये सक्रिय सहकार्य व त्यागाची वृत्ती रूजविणे इ. उदात्त हेतूने ही योजना राबविली जात आहे.

● **ओळखपत्र :-** प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थिनीने प्रत्येक वर्षी नवीन ओळखपत्र (आयडेंटिटी) काढलेच पाहिजे. त्यावर अगदी अलीकडचा फोटो, त्यांची स्वाक्षरी, वर्गाचा उल्लेख आणि प्राचार्यांची स्वाक्षरी इ. गोष्टी आवश्यक आहेत. कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश पावती दाखवून ग्रंथालयातून ओळखपत्र घ्यावे. महाविद्यालय परिसरात ओळखपत्र असणे बंधनकारक आहे.

● **कर्मवीर विद्याप्रबोधिनी :-** रयत शिक्षण संस्थेतील विद्यार्थी व विद्यार्थीनी स्पर्धात्मक परीक्षेत यशस्वी व्हाव्यात म्हणून संस्थेमार्फत विद्या प्रबोधिनी सामान्य ज्ञानाच्या परीक्षा घेतल्या जातात.

● **पोलीस भरतीपुर्व प्रशिक्षण केंद्र**

● **कौशल्य धारित कोर्सेस :** आजच्या प्रचलीत शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थी केवळ पदवी घेऊन बाहेर पडतो. त्यांना कौशल्य तांत्रिक ज्ञान नसते. तसेच ते कोणत्याही प्रकारचा व्यवसाय उद्योगही करु शकत नाहीत. या गोष्टी लक्षात घेता महाविद्यालयाने विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी पदवीबरोबर काही कौशल्ये प्रदान करण्याचे ठरविले यासाठी सन 2008 पासून महाविद्यालयात विविध शॉर्ट टर्म कोर्सेसची सोय विद्यार्थी व विद्यार्थीनींना उपलब्ध करुन दिली आहे. बदलत्या परिस्थितीनुसार विद्यार्थी व विद्यार्थीनी घडाव्यात हा या मागचा मुलभूत हेतू आहे. आमच्या महाविद्यालयात विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रत्येक वर्षी आपल्या आवडीचा अथवा आपल्या विषयाशी संबंधीत एक कोर्स पुर्ण करू शकते. महाविद्यालयामध्ये एकूण अकरा शॉर्ट टर्म कोर्सेस चालविले जातात. या कोर्सेसचा अभ्यासक्रम महाविद्यालयातील प्राध्यापक संबंधित क्षेत्रातील तज्ञांच्या सहाय्याने तयार करतात. प्रत्येक शॉर्ट टर्म कोर्सचा कालावधी सहा महिन्यांचा असून महाविद्यालयाचे प्राध्यापक सदर कोर्सचे समन्वयक म्हणून काम पाहतात. या कोर्सची सलग प्रात्यक्षिके व नियमित तास घेतले जातात.

प्रत्येक कोर्सचा कालावधी संपल्यानंतर प्रात्यक्षिके, लेखी व तोंडी परीक्षा घेतली जाते. वरील प्रमाणे कोर्स पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी व विद्यार्थींना प्रमाणपत्र दिले जाते.

1)सर्टिफिकेट कोर्स इन Tally ERP 9 2) सर्टिफिकेट कोर्स इन स्पोकन इंग्लिश
3) बालवाडी शिक्षक, प्रशिक्षण. 4) फॅशन डिझायनिंग 5) कराटे प्रशिक्षण
6) कुकरी(पाककला) 7) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र 8) ब्युटी पार्लर
9) U.G.C. पुरस्कृत ह्युमन राईटस फौंडेशन कोर्स,बी.ए ३ साठी आवश्यक
10) योगा

वरील शॉर्टटर्म कोर्स पैकी एक कोर्स घेणे आवश्यक आहे.



● **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :-** महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी चालविले जाते. आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थीनींनी टिकाव धरावा यासाठी त्यांना स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केले जाते. युपीएससी, एमपीएससी, बँक स्टाफ सिलेक्शन इ. परीक्षांची तयारी करून घेतली जाते. रयत शिक्षण संस्थेमार्फत तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन टेलीकास्ट केले जाते. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये मर्यादित विद्यार्थी व विद्यार्थीनींना अल्प फीमध्ये प्रवेश दिला जातो. या केंद्रामध्ये स्वतंत्र ग्रंथालय त्यामध्ये स्पर्धा परीक्षा पुस्तके,मासिके इ. उपलब्ध आहेत.

● **शिस्ती संबंधीचे नियम :-**

1) उपस्थिती:-प्रत्येक व्याख्यानास व चर्चेस विद्यार्थी व विद्यार्थिनीने नियमित हजर राहिले पाहिजे. 2) फी :- ठराविक हप्त्याच्या वेळोवेळी फी भरणे, विद्यार्थी व विद्यार्थिनी व कॉलेज या दोघांच्या दृष्टीने सोईचे आहे. केवळ फी भरली की सत्र (टर्म) मंजूर होत नाही. 3) इ. बी. सी. व इतर सवलती मिळणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींची 80% उपस्थिती असणे आवश्यक आहे. ती कमी पडल्यास मिळणाऱ्या सवलती रद्द होण्याची शक्यता असते. 4) प्राचार्यांच्या पूर्व संमतीशिवाय कॉलेजमध्ये कोणतेही मंडळ स्थापन करु नये अथवा कोणताही कार्यक्रम घडवून आणू नये.

5) कॉलेजच्या प्रतिष्ठेला व शिस्तीला बाधा येईल असे कोणतेही वर्तन विद्यार्थी व विद्यार्थिनींनी कॉलेजमध्ये व कॉलेजबाहेर करु नये. शिस्त मोडली तर त्याबद्दल योग्य ते शासन केले जाईल. 6) वर्ग चालू असताना विद्यार्थी व विद्यार्थिनींनी व्हरांड्यात फिरु नये. 7) भ्रमणध्वनी वर्ग चालू असताना बंद करावा. 8) लैंगिक छळ प्रतिबंधक समिती कार्यरत आहे. **महाविद्यालयातील सर्व वर्गाचे प्रवेश शासन व शिवाजी विद्यापीठाच्या नियमानुसार देण्यात येतात.**

## ● बी. ए.भाग । प्रवेशासंबंधी माहिती ●

महाराष्ट्र उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेली 12 वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींना बी.ए.भाग । या वर्गात प्रवेश दिला जातो. त्या विद्यार्थी व विद्यार्थिनीला या माहिती पत्रकाबरोबर जोडलेला छापील प्रवेश अर्ज आवश्यक ती माहिती भरुन दिलेल्या मुदतीच्या आत महाविद्यालयाच्या कार्यालयात आणून दयावा लागेल. अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. 12 वी कला, वाणिज्य व विज्ञान पास विद्यार्थी व विद्यार्थीनींना प्रवेश मिळेल तसेच डी. एड्. उत्तीर्ण असल्यास बी.ए.भाग । ला प्रवेश मिळेल.

1) इ. 12 वी / डी.एड. उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व गुणतक्ता.
2) प्रवेशशुल्क 3) पूर्वीची शाळा किंवा महाविद्यालय सोडल्याचा दाखला.
4) Affidavit Certificate 5) ई-मेल आय डी असणे आवश्यक
6) आधार कार्ड 7) बँक अकौंट आधार संलग्नित 8) डोमासाईल सर्टिफिकेट

● बी.ए.भाग I सेमी 1 व 2 चा अभ्यासक्रम ●

(सोबत जोडलेल्या अर्जाच्या पाठीमागील बाजूवरील अभ्यासक्रमाची माहिती काळजीपूर्वक भरावी.)

अ) आवश्यक विषय–

1) इंग्रजी 2) मराठी 3) लोकशाही, निवडणुका व सुशासन

ब) ऐच्छिक विषय–

शिवाजी विद्यापीठाने ठरवून दिल्याप्रमाणे ऐच्छिक विषयांचे खालीलप्रमाणे दोन गट केले आहेत. विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या गटातील ऐच्छिक विषय निवडावेत. या गटापेक्षा वेगळा विषय निवडल्यास प्रवेश अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. प्रत्येक गटातील किमान एक विषय निवडणे आवश्यक आहे. एकूण चार विषय निवडावेत.

ब) ऐच्छिक गट–

| | | |
|---|---|---|
| गट (अ) – मराठी | / हिंदी | पैकी एक |
| गट (ब) – इंग्रजी | / मानसशास्त्र | पैकी एक |
| गट (क)– इतिहास | / भूगोल | पैकी एक |
| गट (ड) – समाजशास्त्र | / अर्थशास्त्र | पैकी एक |

● बी. ए. भाग II प्रवेशासंबंधी महिती ●

बी.ए.भाग I परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीस बी. ए. भाग II ला प्रवेश मिळेल. शिवाजी विद्यापीठाच्या दि. 16/5/1997 च्या SU/BOS/403 या परिपत्रकानुसार बी. ए. भाग II परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थिनींसाठी ए.टी.के.टी.ची सवलत आहे. त्यानुसार एकूण 6 पेपर्स पैकी चार पेपर्समध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. ए.टी.के.टी. सवलत प्राप्त झालेल्या तारखेपासून तीन वर्षांच्या कालावधीत अशा विद्यार्थी व विद्यार्थिनींना उरलेल्या पेपर्समध्ये पास होणे आवश्यक आहे.

बी.ए.भाग II या वर्गात प्रवेश घेताना या माहितीपत्रकासोबत छापील अर्ज भरणे आवश्यक आहे. अर्जासोबत खालील कागदपत्रे आणावीत.

1) बी.ए.भाग I परीक्षेचा गुणतक्ता
2) पूर्वीचे महाविद्यालय सोडल्याचा दाखला
3) प्रवेश शुल्क इ.



● बी. ए. भाग II चा अभ्यासक्रम ●

अ) आवश्यक विषय–

1) इंग्रजी
2) इंटर डिसिप्लिनरी विषयांपैकी एक विषय
अ) एच.एस.आर.आय. ब) पी. ए.
3) पर्यावरणशास्त्र

आ) ऐच्छिक विषय– बी. ए. भाग I ला घेतलेल्या चार ऐच्छिक विषयांपैकी कोणतेही दोन विषय निवडावेत. निवडलेल्या प्रत्येक ऐच्छिक विषयांचे दोन पेपर्स द्यावे लागतील. अशा निवडलेल्या दोन ऐच्छिक विषयांपैकी कोणत्याही एका ऐच्छिक विषयाशी संबंधित असलेला कोणताही एक इंटर डिसिप्लिनरी विषय निवडावा. ऐच्छिक विषय व त्यांना संबंधित असणारे इंटर डिसिप्लिनरी विषय पुढे दिले आहेत.

इ) विद्यार्थी व विद्यार्थिनींना ऐच्छिक विषय म्हणून दोन भाषा घेता येणार नाहीत.

| ऐच्छिक विषय | इंटर डिसिप्लिनरी विषय |
|---|---|
| 1. मराठी | 1. हिस्ट्री ऑफ सोशल रिफार्म इन इंडिया/सेमी 3<br>हिस्ट्री ऑफ सोशल रिफार्म इन महाराष्ट्र/सेमी 4 |
| 2. हिंदी | 2. पब्लिक ॲड्मिनिस्ट्रेशन |
| 3. इंग्रजी | 3. पब्लिक ॲड्मिनिस्ट्रेशन |
| 4. इतिहास | 1. हिस्ट्री ऑफ सोशल रिफार्म इन् इंडिया/सेमी 3<br>हिस्ट्री ऑफ सोशल रिफार्म इन महाराष्ट्र/सेमी 4<br>2. पब्लिक ॲड्मिनिस्ट्रेशन |
| 5. समाजशास्त्र | 1. हिस्ट्री ऑफ सोशल रिफार्म इन् इंडिया/सेमी 3<br>हिस्ट्री ऑफ सोशल रिफार्म इन महाराष्ट्र/सेमी 4<br>2. पब्लिक ॲड्मिनिस्ट्रेशन |
| 6. मानसशास्त्र | 1. हिस्ट्री ऑफ सोशल रिफार्म इन् इंडिया/सेमी 3<br>हिस्ट्री ऑफ सोशल रिफार्म इन महाराष्ट्र/सेमी 4<br>2. पब्लिक ॲड्मिनिस्ट्रेशन |
| 7. अर्थशास्त्र | 1. पब्लिक ॲड्मिनिस्ट्रेशन |
| 8. भूगोल | 1. पब्लिक ॲड्मिनिस्ट्रेशन |

या महाविद्यालयात बी.ए.भाग III ला विशेष स्तरावर (स्पेशल) मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, इतिहास या विषयांची सोय आहे. बी.ए.भाग II उत्तीर्ण व ए.टी.के.टी. विद्यार्थी व विद्यार्थिनींना बी.ए.भाग ३ ला प्रवेश मिळेल.

## ● बी. ए. भाग III चा अभ्यासक्रम ●

अ) आवश्यक विषय– सेमिस्टर 5,6

१) इंग्रजी पे. नं. E, F

ब) स्पेशल विषय–

| सेमिस्टर 5 | सेमिस्टर 6 |
|---|---|
| इंग्रजी P.No. | इंग्रजी P. No. इंग्रजी |
| 7 | 12 |
| 8 | 13 |
| 9 | 14 |
| 10 | 15 |
| 11 | 16 |

| सेमिस्टर 5 | सेमिस्टर 6 |
|---|---|
| हिंदी P.No. | P. No. |
| 7 | 12 |
| 8 | 13 |
| 9 | 14 |
| 10 | 15 |
| 11 | 16 |

| सेमिस्टर 5 | सेमिस्टर 6 |
|---|---|
| मराठी P.No. | P. No. |
| 7 | 12 |
| 8 | 13 |
| 9 | 14 |
| 10 | 15 |
| 11 | 16 |



| सेमिस्टर 5 | सेमिस्टर 6 |
|---|---|
| इतिहास P.No. | P.No. |
| 7 | 12 |
| 8 | 13 |
| 9 | 14 |
| 10 | 15 |
| 11 | 16 |

| समाजशास्त्र सेमिस्टर 5 | सेमिस्टर 6 |
|---|---|
| P.No. | P.No. |
| 7 | 12 |
| 8 | 13 |
| 9 | 14 |
| 10 | 15 |
| 11 | 16 |

बी. ए. भाग II ला घेतलेल्या दोन ऐच्छिक विषयांपैकी एक विषय घेऊन त्याचे 5 पेपर्स द्यावे लागतील. मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र व इतिहास या पाच स्पेशल विषयांची सोय आहे.

## बी.कॉम भाग १

१२ वी वाणिज्य, सायन्स व व्होकेशनल कोर्सेस पास विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल.

बी.कॉम भाग–१ चे विषय

1) English for Business Communication
2) Business Economics
3) Management Principles & Application
4) Financial Accountancy
5) Principles of Marketing 6) Insurance
7) Democracy Election and Good Governance

बी.कॉम भाग-१ उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल.

बी.कॉम भाग-२ चे विषय

1) English for Business Communication
2) Business Economics
3) Business Statistics
4) Corporate Accounting
5) Money & Financial System
6) Fundamental of Entrepreneurship
7) Environmental Studies

बी.कॉम भाग-२ उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल.

बी.कॉम भाग-३ चे विषय

1) Business Environment (Indian Economics Environment)
2) Business Regulatory Framework
3) Modern Management Practices
4) Co-operative Development
5) Advanced Accountancy - I
6) Advanced Accountancy - II (Auditing and Income Tax)

**• विषय बदलण्यासंबंधी माहिती -**

कोणाही विद्यार्थिनीला प्रवेश अर्जात नमूद केलेले विषय प्राचार्यांच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाहीत. ऐच्छिक विषय बदलण्याची शेवटची तारीख 15 जुलै राहील. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. विषय बदलण्यासाठी विद्यार्थिनीने प्राचार्यांकडे लेखी अर्ज करणे आवश्यक आहे. विषय बदलण्यास परवानगी मिळाल्यानंतरच नवीन विषयांच्या तासांना बसावे.



टीप:- 1) महाराष्ट्र शासन व विद्यापीठ यांच्या आदेशानुसार फी च्या रकमेत बदल केला जाईल. 2) १० डिसेंबरपूर्वी संपूर्ण वर्षाची फी भरल्याशिवाय परीक्षेचा अर्ज विद्यापीठाकडे पाठविला जाणार नाही. 3) वार्षिक स्नेहसंमेलन घेतले जाणार नाही.

**रॅगिंग प्रकाराला आळा घालण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे**

1) प्रवेश निश्चित झालेनंतर रॅगिंगसंबधीचा ऑनलाईन फॉर्म भरून देणे अनिवार्य आहे.
2) या संदर्भात दोषी आढळल्यास तीन वर्षापर्यंतची कैद व रु.25,000/- पर्यंत दंड. त्या सोबत न्यायालयीन चौकशीचा गुन्हा दाखल केला जाईल.
3) रॅगिंग सारखे गैरकृत्य करत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विद्यार्थी व विद्यार्थिनीचा महाविद्यालयातून प्रवेश रद्द करण्यात येईल.
4) महाविद्यालयामध्ये प्रवेशासंदर्भात कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवल्यास नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींनी अन्य व्यक्तीशी किंवा वरिष्ठ विद्यार्थी व विद्यार्थिनींशी संपर्क साधण्यापूर्वी प्राचार्यांशी संपर्क साधावा.
5) प्रवेश घेतल्यानंतर प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या अधिकृत विद्यार्थी व विद्यार्थिनी आहात. तेव्हा तुमच्यापेक्षा वरिष्ठ विद्यार्थी व विद्याथिनींनी किंवा अन्य व्यक्तीने तुमच्या मनाविरुध्द तुम्ही केलेल्या आज्ञेचे पालन गैर राहील.

**पालक, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्याकरिता सूचना**

- सर्व प्रकारच्या सवलती व शिष्यवृत्तीच्या कागदपत्रांची पूर्तता विद्यार्थी व विद्यार्थिनींनी वेळेत करावी. त्यासाठी नियमित नोटीस बोर्ड पहावेत.
- विद्यापीठ परीक्षा अर्ज वेळेत भरुन द्यावेत. अन्यथा लेट फी नियमानुसार भरावी लागेल किंवा परीक्षेस बसता येणार नाही.
- पालकांना नम्र विनंती :- महाविद्यालयामध्ये विद्यार्थी पालक मेळावा आयोजित केला जातो. त्या मेळाव्यास पालकांनी हजर राहणे आवश्यक आहे. महाविद्यालयाला पालकांचे सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. ज्यावेळी महाविद्यालयाकडून आपल्या पाल्यासंबंधी काही माहितीची विचारणा केली जाईल. त्यावेळी पालकांनी त्याची दखल घ्यावी व जरुर ते सहकार्य करावे.

• विद्यार्थी व विद्यार्थिनींनी वर्षातील सर्व परीक्षांना उपस्थित राहून आवश्यक ते गुण मिळवले पाहिजेत. अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

• मुदतीत न आलेल्या शिष्यवृत्ती व शैक्षणिक सवलतीचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

• महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी स्थायी तक्रार निवारण समिती नियुक्त केली आहे.

• प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थिनीजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

• महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी व महिला शिक्षिका यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी लैंगिक छळ प्रतिबंध समिती स्थापन केली आहे.

• एखादया विद्यार्थी व विद्यार्थिनीला प्रवेश देण्याचा व दिलेला प्रवेश रद्द करण्याचा पूर्ण अधिकार प्राचार्यांना असेल.

• **परीक्षा :-** प्रत्येक सत्राच्या अखेरीस परीक्षा घेतली जाईल. परीक्षा सक्तीची राहील. बी. ए. भाग I/II/III या वर्गासाठी सेमिस्टर पध्दती सुरु करण्यात आली आहे.

बी. ए. भाग III या वर्गाला सेमिस्टर पॅटर्न लागू करणेत आला आहे. सेमिस्टर 5 परीक्षेस प्रत्येक विषयाची सेमिनार विद्यार्थी व विद्यार्थ्यींनीने देणे आवश्यक आहे. तसेच सेमिस्टर 6 करिता प्रत्येक विषया करिता 10 गुणांचा प्रकल्प अहवाल प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थ्यींनीने देणे आवश्यक आहे. तरच त्यांना सेमिस्टर 6 करिता वार्षिक परीक्षेस बसता येईल.

प्राचार्य



SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

# CERTIFICATE

This is to certify that University approval is given to ***Sou. M.R.Jagtap Mahila Mahavidhyalaya Umbraj, Tal. Karad, Dist. Satara*** to conduct the following courses for the academic year 20 - 20

**ARTS & SOCIAL SCIENCE FACULTY**

**BA-I Grant-in-aid-Division-1** **Permanant Affiliation**

Govt. Recent approval – युकेएफ/1091/89 (4205) विशि-2 दि. 31 मार्च, 1999
University recent approval – संलग्नता /टी.2/1213/दि. 21 मे 2004
Compulsory – इंग्रजी, मराठी
Optional – मराठी, इंग्रजी, हिंदी, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, भूगोल.

**BA-II Grant-in-aid-Division-1** **Permanant Affiliation**

Govt. Recent Approval – युकेएफ/1091/89 (4205) विशि-2 दि. 31 मार्च, 1999
University Recent Approval – संलग्नता /टी.2/1213/दि. 21, मे, 2004
Compulsory – इंग्रजी, पर्यावरणशास्त्र,
Optional – मराठी, इंग्रजी, हिंदी, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, भूगोल, आयडीएस-एच.एस.आर.एम, लोक प्रशासन

**BA-III Grant-in-aid-Division-1** **Permanant Affiliation**

Govt. Recent Approval – युकेएफ/1091/89 (4205) विशि-2 दि. 31 मार्च, 1999
University Recent Approval – संलग्नता /टी.2/1213/दि. 21, मे, 2004
Compulsory – इंग्रजी
Optional – मराठी, इंग्रजी, हिंदी, समाजशास्त्र, इतिहास.

Place: Kolhapur
Date:

**DIRECTOR**
**Board of College & University Development**

## *Instruction to the Students*

1. Every student should see the complete syllabus prescribed for the concerned course and take note of all rules and regulations.
2. Attendance of minimum 75% is essential (Please refer ordinaces 30 to 37).
3. Students shall follow all the rules and regulatios of the University and College thereof.
4. The facility to complete another degree through distance mode (externally) is available from academic year 2007-08.
5. The results of the university examinations are available at 12525 for B.S.N.L. Landline and Mobile holders. The students can obtain printed copy of their statement of marks from University Website, which can be used for the purpose of verification of marks and to obtain the Xerox copy of Accessed answer book.
6. Students can avail the facility of revalution after getting a Xerox copy of the assessed answer book or verification of the marks.
7. The studens having confidence to have change in result due to verification or revaluation can take provisional admission subject to confirmation of change in result due to verification or revaluation.
8. The rules and regulations are available on the University website, www.unishivaji.ac.in Important frequently referred rules are sent to the colleges in the printed booklet forms prepared by the four sections of the University.
9. Students should complete all requirements of the course in due course of time.
10. Students should use only blue ink for all examination works except where permission otherwise permitted to use the other ink is given.
11. The present intake for the certified courses of B.A., B.Com., and B.Sc. is 120 students per division.
12. The above mentioned course are grantable courses and the tuition fee for these courses is,for B.A. Rs.800/- tuition fee,B.Com. Rs.800/- and B.Sc. Rs. 800/- respectively. In addition, laboratory fee Rs. 125/- for B.Sc. course only. The fees for prosessional courses shall be applicable as per fixed by Shulka Nirdharan Samittee or University.
13. Examination calendar for the University Examination is to be declared in the first week for complete year 2009-10 and student should verify the same and if there is any change needed student should communication it within fifteen days.
14. Separate certificate will be issued by the University for additional course, if that course is to be started from the academic year 2009-10.
15. University is not responsible for any loss or otherwise if a student takes admission to any course other than those approved by University.
16. Every student must possess the necessary student Identity Card issued by the respective college.
17. Every Student should be a member of Student Insurance Scheme.
18. Money/Cash sent to University DD form payable to Finance & Accounts Officer.
19. Take benefit of C.O.Courses/Lead college Scheme activities.
20. The students, parents, citizens shall visit the University website www.unishivaji.ac.in for details of the same.

*रयत शिक्षण संस्थेचे,*

# सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

## हमीपत्र

मी चि./कु./सौ.-----------------------------

वर्ग ---------------- शैक्षणिक वर्ष 20 - 20 मध्ये

आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिते. माझी सदर वर्गातील उपस्थिती ठरवून दिलेल्या एकूण दिवसांपैकी 80% प्रमाणात भरली नाही तर महाविद्यालय/विद्यापीठ परीक्षेस बसण्यास मला अपात्र ठरविले जाईल याची मला माहिती असून असे घडल्यास त्या संदर्भात माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

पालकाची स्वाक्षरी

विद्यार्थी/विद्यार्थींनी स्वाक्षरी

प्राचार्य,<br>सौ. मंगलताई रामचंद्र जगताप<br>महाविद्यालय, उंब्रज.